पारावरच्या गप्पा

# शाश्वत उत्पादनासाठी हवी 'एकात्मिक' शेती पद्धती



मंदिरे उघडल्याने आज गणपतने देवाचे जवळून दर्शन घेतले. त्यामुळे तो आनंदी होता. थोडा वेळ देवळात बसून संपतची वाट पाहत पारावर येऊन बसला. संपतनेही मंदिरात दर्शन घेऊन गणपतजवळ बैठक मारली. दोघांनीही एकमेकांकडे बघून आनंद व्यक्त केला.

गणपत म्हणाला, ''संपा, झाली एकदाची देवाची कुलुपातून मुक्तता. आज बरे वाटले देवाचे जवळून दर्शन घेऊन.''

त्यावर हसूनच संपतने मान डोलावली. गणपत पुढे सरकून म्हणाला, ''संपा, आता रब्बीची तयारी केली. मागील खरीप काही मनासारखा झाला नाही. फार नुकसान झाले. हाती आलेल्या शेतीमालालाही पाहिजे तसा दर मिळाला नाही. आता सर्व काही रब्बी हंगामावर आहे बघ! नाही तर काही खरं नाही संपा! एक तर नुकसान झाले, आता हंगाम सुरू होतो तर वातावरण बिघडले. या कोरोनामुळे कशाला काय भाव मिळेल याची निश्चिती नाही. मागील वर्षीचा निम्मा कांदा सडल्यामुळे फेकून दिला. थोडाफार राहिला तर शासनाने मध्येच पचका केला! आयात कांदा, निर्यात बंद, व्यापाऱ्यांना खरेदीवर बंधन हे निमित्त झाले आणि सर्व काही अपेक्षा कांद्याकडून होत्या त्या मातीमोल झाल्या. खर्चही निघाला नाही. संपा ऊसाचेही तेच होऊन राहिले! पाऊस जास्त पडल्यामुळे ऊसाची वाढ चांगली झाली नाही. मध्येच हुमणी या किडीने डोके वर काढले. चक्रीवादळाने ऊस सपाट केला. आता कारखाने काय भाव देतील याबद्दल काहीच माहिती नाही; त्यामुळे ऊसाकडूनही काही फार अपेक्षा नाही. दुधात तर माशीच पडली, त्यामुळे दूध उत्पादक यावर्षी उपाशीच राहिला! या सर्व बाबींमुळे माझं तर डोकंच चालंना की आता या रब्बी हंगामात कोणतं पीक घेतलं तर हमखास पैसे मिळतील त्याबद्दल!''

गणपतने मांडलेले हे प्रश्न सर्वच शेतकऱ्यांना भेडसावत आहेत, तसेच आपणही यातून जात आहोत याची जाणीव असूनही संपत म्हणाला, ''हे बघ गंपा, शेतीमध्ये कोणतेही एक पीक घेतले तर हमखास पैसे मिळतील अशी कोणतीही व्यवस्था आपल्या मायबाप सरकारने केलेली नाही. हवामानात बदल, ग्राहकांच्या मागणीमध्ये चढउतार, उत्पादनामध्ये चढउतार यामुळे नेमके कोणते पीक घेतले तर फायद्याचे होईल हे सांगणे कठीण आहे. सरकारने प्रत्येक शेती उत्पादनाला

हमीभाव ठरवून दिलेला असला तरी मार्केटमध्ये गेल्यानंतर तो भाव मिळेल अशी व्यवस्थाच नाही. त्यामुळे आता आपणच काहीतरी बदल केला पाहिजे. सरकार म्हणतंय विकेल तेच पिकवा. पण आपल्याला तर काहीच माहीत नाही की चार-पाच महिन्याने काय विकले जाईल आणि कोणत्या भावाने! याबद्दलची माहिती प्रत्येक शेतकऱ्याला पीक लावण्याच्या आधी दिली तर आपण त्याप्रमाणे उत्पादन घेऊ. परंतु तशी व्यवस्था आपल्याकडे नाही. म्हणून आपला कोणी वाली येईल आणि आपल्याला तो यातून बाहेर काढेल या आशेवर राहण्यापेक्षा आपणच आपला वाली झाले पाहिजे. आपणच गरजेनुसार पीक पद्धतीत बदल केला पाहिजे.''

गणपतला मात्र यातलं काहीच पटत नव्हतं. ''संपा, कोड्यात बोलू नको. स्पष्ट सांग! आपणच आपला वाली व्हायला आपण काय टाटा- बिर्ला आहोत काय? आपल्या शेतीमालाचे किती उत्पादन घ्यावयाचे आणि ते ग्राहकांना किती किंमतीला विकायचे अशी कोणतीच व्यवस्था कारखानदारांप्रमाणे आपल्यासाठी नाही संपा. त्यामुळे उगाच तू मला काहीतरी गाजरे दाखवून माझं मन राखू नको! तुला काय म्हणायचं ते स्पष्ट सांग.''

त्यावर संपत हसून म्हणाला, ''मी तुला गाजर दाखवत नाही आणि गाजर खाऊही घालत नाही. मी काय राजकारणी माणूस आहे काय? मला हे सांगायचे की आपली जमीन, पाणी, हवामान आणि सर्वसाधारण मार्केट यांचा विचार करून एकच एक पीक न घेता किंवा एकाच व्यवसायावर अवलंबून न राहता एकात्मिक शेती पद्धतीचा अवलंब केला पाहिजे. म्हणजे हे बघ, तू आज सर्व शेतात कांदा केला आणि हवामान, बाजारभावामुळे कांद्याचा वांदा झाला मग गेला तू बाराच्या भावात! त्यापेक्षा आहे त्या जमिनीत दोन- तीन पिकांचे नियोजन कर. म्हणजे या पिकांपैकी एखाद्या पिकातून चांगला पैसा जमा होईल किंवा एखादे पीक तोट्यात गेले तरी त्याचा फार मोठा आर्थिक फटका बसणार नाही. मागील हंगामात मी मका, कापूस, सोयाबीन केले होते हे तुला माहीतच आहे. मका पीक तर तोट्यातच गेलं. कपाशीचे बऱ्यापैकी उत्पादन आले परंतु फार नफा झाला नाही. पण मका, सोयाबीनचे एकरी १२ क्विंटल उत्पादन मिळाले. त्यामुळे मला फार तोटा सहन करावा लागला नाही. तू मात्र सर्व मका लावला. तुला वाटलं मुरघासाला मका जाईल, दुधाला भाव नसल्यामुळे लोकांनी मका विकत घेतला नाही. मक्याच्या धान्यालाही चांगला भाव मिळाला नाही. पावसामुळे मक्याचे उत्पादनही चांगले आले नाही. त्यामुळे तू सर्व क्षेत्रावर मका घेतल्यामुळे तुला फार मोठा तोटा झाला. म्हणून म्हणतो, आता तू एकच एक पीक घेण्याचे टाळ. त्याऐवजी २-३ प्रकारच्या पिकांचे नियोजन कर.'' यावर गणपतेही मान डोलावली.

''संपा, तू म्हणतो ते अगदी बरोबर आहे. पण अनेकदा कोणत्याच शेतीमालाला भाव मिळत नाही किंवा हवामान, पावसामुळे पिकाचे नुकसान होते. अशावेळी मात्र फारच हाल होतात.''

यावर संपत म्हणाला, ''गंपा, तू म्हणतो तेही बरोबर आहे. म्हणून आपल्या शेती पद्धतीमध्ये मोठ्या प्रमाणात बदल करत असताना, पीक उत्पादनाबरोबरच शेतीवर आधारित एखादा जोडधंदा करणे गरजेचे आहे. उदा. दुग्धव्यवसाय, शेळीपालन, कुक्कुटपालन, रेशीम उद्योग, मधमाशीपालन, मत्स्यपालन, गांडूळ खत निर्मिती, फळे, भाजीपाला उत्पादन यासारख्या व्यवसायांची जोड पीक उत्पादनाला दिली तरच शेती किफायतशीर होईल. यालाच आपण 'एकात्मिक' शेती पद्धती म्हणतो. यामुळे काय होईल गंपा, आपल्याला पिकामधून तोटा झाला तर एखादा जोडव्यवसाय त्यातून बाहेर काढेल किंवा व्यवसायामध्ये तोटा झाला तर एखाद्या पिकाचे उत्पादन हातभार लावेल. म्हणजेच अशा पद्धतीने नियोजन करायचे की त्यामुळे आपला शेती व्यवसाय तोट्यात जाणार नाही याची काही प्रमाणात शाश्वती मिळेल.''

गणपत मान डोलावतच म्हणाला, ''पण संपा, मागे मी शेळीपालन केले. तीन वर्षात तो व्यवसाय बंद करावा लागला, परत शेळ्यांचे नाव घेतले नाही.''

यावर हसून संपत म्हणाला, ''संपा आपण येथेच तर चुकतो. एखाद्या वर्षी एखाद्या पिकाचे जास्त पैसे झाले की आपण त्या पिकाकडे वळतो. एखाद्या वर्षी

शेळ्यांना जास्त किंमती आल्या की मग शेळ्या पाळतो. दुधाचे भाव कमी झाले की गाई विकून टाकतो. सर्व शेतकरी एकाच पिकाच्या किंवा एकाच व्यवसायाच्या मागे लागले की त्याचे उत्पादन वाढते. दर पडतात आणि व्यवसाय तोट्यात जातो. म्हणून गंपा, कोणतेही पीक करताना कमीत कमी ३ ते ५ वर्षे सलग पीक करावे किंवा व्यवसाय सुरू करायचा असेल तर ५ ते १० वर्षे तरी व्यवसाय सुरू राहील याची काळजी घ्यावी, म्हणजे काय होईल- यापैकी १-२ वर्षे तोटा होईल, १-२ वर्षे सर्वसाधारण उत्पादन मिळेल आणि १-२ वर्षे मोठ्या प्रमाणात फायदा होईल. म्हणजेच कोणत्याही व्यवसायाचे उत्पन्नाचे आकडे १-२ वर्षांच्या उत्पन्नावर ठरवू नये. कमीत कमी ३-४ वर्षांची सरासरी काढली तरच तो व्यवसाय किंवा पीक आपल्याला किफायतशीर होईल. एकात्मिक शेती पद्धतीमध्ये पिकांची तसेच व्यवसायाची निवड सर्व विचार करून करावी. एकदा का एकात्मिक शेती पद्धतीत पिके- व्यवसाय ठरविले तर कमीत कमी पाच वर्षे त्यात सातत्य ठेवावे. ज्यावर्षी एखादा व्यवसाय तोट्यात जातो त्यावर्षी तो व्यवसाय पूर्णपणे बंद करू नये. माझा तर अनुभव असा आहे की ज्यावर्षी ते पीक किंवा व्यवसाय तोट्यात जातो त्यावर्षी आपण त्यास सुरुवात करावी अर्थात बाजारपेठ, शासनाचे धोरण, आपल्याकडील वातावरण, जमीन, पाणी, तंत्रज्ञान आणि एकूणच सर्व बाबींचा विचार करून एकात्मिक शेती पद्धत ठरवावी. शेजाऱ्याला जास्त पैसे मिळाले म्हणून आपण त्यात उडी न घेता डोळे, कान आणि डोके जागेवर ठेवूनच निर्णय घ्यावा.''

यावर गणपत मोठ्याने हसून म्हणाला, ''संपा, तू अगदी बरोबर बोलला बघ. आता मलाही माझ्या शेतामध्ये काय काय करायचे आहे याबद्दल थोडा अंदाज येऊ लागला आहे. मी आज चांगला विचार करतो, सर्व काही कागदावर लिहून काढतो. तू म्हणतो त्या पद्धतीने सर्व जमिनीमध्ये पिकाचे पाच वर्षांचे नियोजन करतो आणि नेमका कोणता व्यवसाय सुरू करता येईल याबद्दल घरच्यांशी चर्चा करतो. पण मित्रा, उद्या हे लिहिलेले घेऊन आल्यावर मला थोडे मार्गदर्शन कर.''

यावर संपत म्हणाला, ''हो रे मित्रा उद्याचं उद्या बघू, चल आज मला चहा पाज चांगला स्पेशल!''

**(सौजन्य : 'पूर्वा कृषिदूत' परिवार)** ■

## लेखकांना आवाहन...

**'पूर्वा कृषिदूत'** परिवाराशी आपण गेली काही वर्षे लेखक या नात्याने निगडित आहात, याचा मन:पूर्वक आनंद वाटतो. (सध्या आपण प्रस्तुत मासिक डिजिटल स्वरुपात प्रकाशित करीत आहोत. ही बहुरंगी ऑनलाईन आवृत्ती आपणास कशी वाटते, ते जरुर कळवा.)

आपल्या लेखासोबत आपला सविस्तर पत्ता मोबाईल नंबरसह नमूद करावा ही विनंती. तसेच आपला पासपोर्ट आकाराचा फोटोही जरुर पाठवावा. आपले लेखन सहकार्य असेच लाभत राहील याची खात्री आहेच; आपल्या नवीन उपक्रमांना तसेच व्यक्तिगत, व्यावसायिक संकल्पांना आमच्या हार्दिक शुभेच्छा.

-: आमचा पत्ता :-

पूर्वा कृषिदूत, एम-११३, एम.आय.डी.सी., अंबड, नाशिक- ४२२०१० (महाराष्ट्र).
email:poorvakrushidoot@gmail.com

**- संपादक, 'पूर्वा कृषिदूत'**